REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | OCTOBER– 2017



## संत मुक्ताबाई : जीवनचरित्र व वाङ्मयीन समीक्षा

**प्रा. डॉ. माधव बसवंते**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख ,**
**राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड.**

सारांश :

निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई ही चारही भावंडे अत्यंत कुशाग्र बुद्धिमान होती. 'सन्याशाची मुले' म्हणून त्यांना बालपणापासून ते जीवनाच्या शेवटपर्यंत समाजाकडून त्यांना क्षणाक्षणाला प्रचंड अपमानाला सामोरे जावे लागले. लहानपणीच या भावंडाच्या आई-वडिलांचे छत्र हरपले. या भावंडातील सर्वात धाकट्या संत मुक्ताबाई होत्या. संत मुक्ताबाई या नाथसंप्रदायी असणाऱ्या निवृत्तीनाथांकडून स्वतः उपदेश घेतला असला, तरी संत ज्ञानेश्वरांचा वारकरी संप्रदायाचा वारसा त्यांनी पुढे समर्थपणाने चालविला आहे. संत मुक्ताबाई या अत्यंत तेजस्वी, बंडखोर व स्पष्टवादी होत्या. संत मुक्ताबाईच्या या भावंडाने आयुष्यभर समाजाचे सतत आघात सहन करूनही त्यांनी या समाजाला ज्ञानाचा नवा प्रकाश दिला. माणूस म्हणून जगण्याची नवी दिशा दिली. मानवतेचे तत्त्वज्ञान दिले. संत मुक्ताबाईंनी आपल्या अभंगरचनेतून सातत्याने उपदेश केला. म्हणून तिची भूमिका प्रबोधन आणि उद्‌बोधनाची राहिलेली आहे. मुक्ताबाई कुमारी असल्या तरी त्या मातृत्वाच्या पातळीवर जाऊन उपदेश करताना दिसून येतात. तिच्या अभंगात जीवनसत्य आहे. वैराग्याचे तेज आहे. तिने आपल्या अभंगातून 'मुक्त' ज्ञान पेरली आहे. या तिच्या ज्ञानातून व उपदेशातून तिने अनुभवलेल्या भावविश्वाचे आपणास प्रभावीपणे दर्शन होते. एक 'ज्ञानयोगिनी' म्हणून संत मुक्ताबाईचा यथार्थ गौरव केला जातो. ती अतिशय स्पष्टवक्ती, तेजस्वी, बंडखोर, कर्तव्यदक्ष, बुद्धिमान व भावनाप्रधान स्त्री होती. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव व सोपान या भावंडांची बहिण व आईची अशी दुहेरी भूमिका तिने धैर्याने पार पाडली.

बीजसंज्ञा – मुक्ताबाईंची अभंगरचना, उपदेशपर अभंग, गुरूकृपेचे अभंग, हरिपाठाचे अभंग, आध्यात्मिक अंगाईगीते, कूट अभंगरचना, ओवी, ताटीचे अभंग.

### प्रस्तावना

संत ज्ञानेश्वरांच्या भावंडातील सर्वात धाकटी व लाडकी बहिण म्हणजे संत मुक्ताबाई होय. संत मुक्ताबाईला भ.श्री.पंडित यांनी 'बालसंन्याशिनी' म्हणतात. जनाबाई तिला 'आदिशक्ती' व कान्होपात्रा तिला 'मूळ माया ती मुक्ताई' असे संबोधतात. संत मुक्ताबाईला अल्प आयुष्य लाभले असले तरी तिला लवकरच प्रौढत्व आले. आई-वडिलांच्या देह त्यागानंतर मुक्ताबाईचे बालपण व तिचा जीवनचक्र निवृत्तीनाथ व संत ज्ञानेश्वरांच्या छत्रछायेखाली गेला. आपल्या ज्ञानसंपन्न भावांच्या संस्कारामुळेच तिची आध्यात्मिक उंची वाढली. अगदी लहानपणापासूनच सातत्याने भटकंती करावी लागल्यामुळे मुक्ताबाईबरोबर या सर्व भावंडांना समाजातील अन्याय, अत्याचार, छळ, दुःख, वेदना हे जवळून पाहता आले, प्रसंगी सामाजिक वास्तवता अनुभवता आली. यामुळेच मुक्ताबाईंने तत्वचिंतक योग्याला समर्थपणाने मार्गदर्शन करीत करीत उपदेशही केला. आपल्या मोठ्या भावांना मायेचा ओलावा व आधार दिला. संत मुक्ताबाई म्हणजे अस्मिता, स्वाभिमान, प्रतिकार, उपदेश, ममता आणि प्रबोधनाचे प्रतिकच होय.

## संत मुक्ताबाईचे जीवनचरित्र

संत मुक्ताबाईचे मूळचे घराणे हे पैठणजवळ गोदावरीच्या तिरावर वसलेले आपेगावचे. गोविंदपंत व निराबाई यांच्या पोटी संत मुक्ताबाईच्या वडीलांचा जन्म झाला. विठ्ठलपंत व रूक्मिणी या आई-वडिलांच्या पोटी संत मुक्ताबाईचा जन्म इ.स.१२७९ मध्ये झाला. विठ्ठलपंत व रूक्मिणी यांना विवाहानंतर सात-आठ वर्षे होऊनही त्यांना पुत्रप्राप्ती झाली नाही. त्यामुळे पती-पत्नी निराश होऊन आळंदीला गेले. दिवसेंदिवस त्या दोघांचीही निराशा वाढत होती. रूक्मिणीची कळत-नकळत परवानगी घेऊन अखेर विठ्ठलपंत काशीला जाऊन तेथे स्वतःची वैवाहिक माहिती लपवून ठेऊन ते रामानंद स्वामीचे शिष्य म्हणून त्यांच्याकडून संन्यासाची दीक्षा घेतली. काशीच्या परिसरात ते वावरू लागले. मात्र दुसरीकडे विठ्ठलपंतांचे गुरू रामानंद स्वामी हे तीर्थाटनाच्या निमित्ताने आळंदीस आले. आळंदीस आल्यानंतर रामानंद स्वामी व रुक्मिणी यांची भेट झाली, त्यावेळी 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद रामानंद स्वामींनी रूक्मिणीला दिला. यावेळी रुक्मिणीने रामानंद स्वामींना सर्व हकिकत सांगितली, त्यामुळे रामानंद स्वामी हे काशीला गेल्यानंतर विठ्ठलपंतांना संन्यासाश्रम सोडनू देऊन पुन्हा एकदा गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली. गुरू रामानंद स्वामींच्या आज्ञेमुळे ते परत आळंदीला येऊन पत्नी रूक्मिणीसोबत संसार करू लागले. त्यानंतर विठ्ठलपंत व रूक्मिणी यांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई या चार अपत्यांचा जन्म झाला. विठ्ठलपंतांनी आपल्या मुला-मुलींची नावेही आशयपूर्ण ठेवली आहेत. गुरू रामानंद स्वामींच्या आज्ञेनुसार संन्यासाची घेतलेली निवृत्ती असून मोठ्या मुलाचे नाव निवृत्ती असे ठेवले. आपल्या पोटी ज्ञानानेच जन्म घेतला म्हणून ज्ञानदेव. ज्ञानप्राप्तीचा जीना म्हणून सोपान आणि ज्ञानसोपान मार्गाने जाणाऱ्यांना शेवटी मुक्ती मिळते म्हणून मुक्ता. या चारही तेजस्वी भावंडांना अवतार मानले जाते, निवृत्ती (शंकर), ज्ञानेश्वर (विष्णू), सोपान (ब्रह्मदेव) आणि मुक्ताईला आदिमायेचा अवतार वा अंश मानल्या जाते.

विठ्ठलपंत व रूक्मिणीच्या देह त्यागानंतर या चारही मुला-मुलींना समाजाने स्वीकारावे की नाही याविषयीचा निर्णय घेण्यासाठी आळंदीच्या धर्मपंडितांनी या भावंडांना पैठणला पाठविले. कारण त्यावेळी पैठण हे सनातन धर्माचे मोठे केंद्र होते. येथे अनेक विद्वान धर्मपंडित वास्तव्यास होते. धर्मशास्त्रासंबंधीचे अनेक निर्णय पैठणलाच घेतल्या जात होते. या प्रश्नाचा निर्णय वा निवाडा करण्यासाठी पैठण येथे मोठी धर्मसभा झाली. या सभेत ज्ञानदेवांनी आपल्या ज्ञानाचे दर्शन घडविले, तसेच याच ज्ञानदेवांनी एका रेड्याच्या तोंडून वेद वदविल्याची चमत्कारिक कथाही सांगितली जाते. त्यानंतर ही भावंडे इतरत्र प्रवास करीत होती. नेवासे येथील एका मुक्कामात असताना निवृत्तीनाथांच्या आग्रहावरून ज्ञानदेवांनी भगवतगीतेवरील साधारणातः नऊ हजार ओव्याचे मराठी भाष्य लिहिले. नेवासे, आळंदी, आपेगांव, पंढरपूर असा प्रवास करीत ज्ञानदेवांनी इ.स.१२९६ मध्ये आळंदी येथे समाधी घेतली. यानंतर ही भावंडे अतिशय उदास झाली होती. आळंदीहून ही भावंडे सासवड येथे आली. येथे सोपानने समाधी घेतली. ज्ञानदेव व सोनानने समाधी घेतल्यामुळे मुक्तबाई ही अत्यंत दुःखी झाली होती. म्हणून निवृत्तीनाथांनी हे गाव सोडून इ.स.१२९७ मध्ये एदलाबाद येथे आले. (जळगाव जिल्ह्यातील 'एदलाबाद'चे महाराष्ट्रशासनाने 'मुक्ताईनगर' असे नामकरण केले आहे.) एके दिवशी अचानक आकाशात विजांचा कडकडाट झाला, या विजेच्या कडकडाटात संत मुक्ताबाई इ.स.१२९७ मध्ये तापी नदीवरील माणगाव येथे त्या अदृश्य झाल्या, स्वरूपकार झाल्या. विजेच्या कडकडाटामध्ये विलीन झाल्या. पूर्वीचे एदलाबाद म्हणून ओळखले जाणारे व सध्याचे मुक्ताईनगर येथे संत मुक्ताबाईची समाधी आहे.

## मुक्ताबाई व नामदेव :

महाराष्ट्रभर तीर्थाटन करीत करीत ही चारही भावंडे पंढरपुरात दाखल झाली. पंढरपुरातील चंद्रभागेत स्नान करून पांडुरंगाचे दर्शन घेऊन मंदिराबाहेर आल्यानंतर त्यांना संत नामदेव आपले देहभान हरपून नाचत असताना दिसले. ही भावंडे संत नामदेवाजवळ जाऊन निवृत्तीनाथांनी व ज्ञानदेवांनी त्यांना नमस्कार केला. पण संत नामदेवांनी आपल्या अहंकारामुळे या भावंडांना प्रतिनमस्कार केला नाही. अहंकारी माणसांच्या चरणावर मी मस्तक ठेवणार नाही असे सांगून त्या पुढे म्हणतात की, 'ज्ञानाशिवाय भक्ती व्यर्थ आहे; ज्या भक्तीला ज्ञानाची जोड नाही, अशी भक्ती काय उपयोगाची?' तसेच जे भक्त संतांना मान देत नाहीत. अशा अहंकारी भक्तांना आपणही मान काय म्हणून द्यावा? 'ज्यांना अखंडपणे देवाचा सहवास मिळत आहे, ज्यांनी आपल्या भक्तीने देवाला प्रसन्न केले आहे, परंतु त्यांच्यामध्ये असलेला अहंकार अजून गेलेला नाही, त्यांना मी नमस्कार करणार नाही' असा स्पष्टपणा मुक्ताईच्या व्यक्तिमत्वात दिसून येतो.

निवृत्तीनाथ व ज्ञानदेवासारख्या प्रतिभासंपन्न ज्ञानी व विद्वान भावांचा अपमान करण्यात यावा, या प्रसंगाने मुक्ताबाई अतिशय संतापली आहे. अहंकारी नामदेवाला मुक्ताबाईने 'कच्चे मडके' अशी उपमा देतात. मुक्ताबाईने आपणास कच्चे मडके म्हणून आपला अपमान केला म्हणून नामदेव पंढरपुरात जाऊन पांडुरंगास शरण जातात. पांडुरंगाच्या आज्ञेप्रमाणे संत नामदेव हे

विसोबा खेचर यांना गुरू मानून त्यांना शरण जातात. तेथून पुढे नामदेव हे खऱ्या अर्थाने निगर्वीपणाने भक्तीमध्ये एकरूप होतात. 'लहानशी मुक्ताई जैसे सणकांडी । केले देशाधडीं महान संत' अशा शब्दात नामदेवांनी तिचा गौरव केला आहे.

## मुक्ताबाई व चांगदेव

निवृत्तीनाथ हे मुक्ताबाईचे गुरू तर मुक्ताबाईने चांगदेवासारख्या हटयोग्याला शिष्य म्हणून स्वीकारले. चांगदेव हा पूर्वजन्मीचा इंद्र असून तो अतिशय बुद्धिमान होता. सर्व शास्त्रांमध्ये तो प्रवीण व शंकराचा परमभक्त होता. चांगदेवाची गुरू मुक्ताबाई ही वयाने लहान आहे, तर चांगदेव हा शिष्य वयाने मोठा आहे. मुक्ताबाईंनी गुरू-शिष्याच्या पलिकडे जाऊन 'माता व पुत्र' नाते स्वीकारले आहे. ज्यांनी आपल्या योग साधनेद्वारे आपल्या मृत्यूलाही परत पाठविले; नाग व वाघ यासारख्या विषारी प्राण्यांवर आपले अधिकार गाजवले आणि ज्यांनी चौदाशे वर्षे आपले आयुष्य जगले असे चांगदेव हे मुक्ताबाईचे पहिले शिष्य होते. मुक्ताबाई व चांगदेव यांच्या संवादातील अभंगरचना उपलब्ध असून ती तीन विभागात आहेत. पहिल्या विभागात मुक्ताबाई व चांगदेव यांचा संवाद आहे. दुसऱ्या विभागात मुक्ताबाईचा ज्ञानोपदेश आहे, तर तिसऱ्या विभागात कूट अभंग आहेत. त्यांच्या अभंगाचे स्वरूप हे प्रश्नोत्तराचे अहे.

## संत मुक्ताबाईची अभंगरचना

संत मुक्ताबाईच्या नावावर संख्येने कमीच असलेली अभंगरचना दिसून येते. संत मुक्ताबाईचे केवळ ४२ अभंग उपलब्ध असल्याचे डॉ.अ.ना.देशपांडे सांगतात, तर वाङ्मय कोशकार मात्र ही त्यांची संख्या ५० एवढी सांगतात. त्यांच्या अभंगाचे विषय भिन्न-भिन्न स्वरूपाचे आहेत. संत मुक्ताबाईचे अभंग हे प्रामुख्याने पंढरीमाहात्म्य, नाममाहात्म्य, संत लोकोद्धार, उपदेश, ज्ञान व कूट यासारख्या विषयांना स्पर्श करणारे आहेत. 'मुक्ताबाईच्या अभंगविश्वाकडे जाणारी वाट ज्ञानेश्वरांच्या अभंगातून गेली आहे. त्यामुळे मुक्ताबाईची कविता स्वतंत्रपणे अभ्यासता येत नाही. ज्ञानेश्वरीशी आणि विशेषतः ज्ञानेश्वरकृत अभंगांशी आपला दाट परिचय झाल्याखेरीज मुक्ताबाईंच्या अभंगवाणीशी आपली जवळीक होणे कठीण आहे. ज्ञानेश्वरांची अभंगनिर्मिती, त्यातील अनुभवविश्वाचे स्वरूप, त्यास प्रकट करणारी त्यांची शब्दकला, इत्यादी गोष्टी लक्षात आल्यावरच मुक्ताबाईंच्या अभंगांचे वेगळेपण आपल्या हाती लागणे शक्य असते.'[१]

## उपदेशपर अभंग

संत मुक्ताबाईने जगाचा अनुभव घेतलेला नाही. तिचे अनेक अभंग हे उपदेशात्मक स्वरूपाचे आहेत. या उपदेशात्मक अभंगातून मुक्ताबाईची भूमिका ही ज्ञानात्मक व प्रबोधनात्मक दिसून येते. मुक्ताबाई या आपल्या अभंगरचनेतून वाङ्मयीन गुणांपेक्षा उपदेशात्मक अधिक असल्याचे जाणवते. मुक्ताबाईचे काही उपदेशाचे अभंग हे निवृत्तीनाथांच्या सांकेतिक उपदेशपर अभंगांशी नाते असल्याचे स्पष्टपणे जाणवते. भगवंत हा केवळ देवळात नसतो, तर तो सर्वत्र असतो. आपल्याच घरात असलेल्या देवाला विसरून देवळातील देवाची पूजा करण्यास काही अर्थ नसतो. ईश्वराच्या नामासी व त्याच्या चित्तासी एकदाचे एकरूप झाले की आपल्या मनाच्या सर्व इच्छा पूर्ण करता येतात असा स्वानुभवाचा उपदेशही त्या साधकांना स्पष्टपणे करतात. प्रपंचात मग्न झालेल्या माणसाला मुक्ताबाईने अध्यात्माचा योग्य मार्ग दाखवून त्यांना सावध करण्याचा उपदेश करतात. संत निवृत्तीनाथ व संत ज्ञानदेव या आपल्या भावंडांच्या बुद्धिमत्तेचा व लोकोद्धाराचा आदर्श मुक्ताबाईसमोर आहे. माणसांना उपदेश करणे हाच तिच्या अभंगांचा सर्वाधिक हेतू आहे. संत मुक्ताबाई ज्ञानाविषयी अधिक बोलते. उपदेश करण्याचा तिचा अधिकार आहे. बुद्धिवादी असलेल्या मुक्ताबाईच्या अभंगामध्ये विभिन्न अशा उपदेशाचे दर्शन आहे. संत मुक्ताबाईचे अर्ध्यापेक्षा जास्तचे अभंग हे उपदेशात्मक आहेत.ती आपल्या जीवनाविषयी व दुःखाविषयी न बोलता अनुभवाच्या ज्ञानात्मक पातळीवर जाऊन अधिक उपदेश करतांना दिसून येते. तिचे उपदेशात्मक ज्ञान हे शेवटी उच्च तत्त्वज्ञानाची पातळी गाठते. मुक्ताबाई या साधकांना उद्देशूनच अधिक उपदेश करतात.

## गुरूकृपेचे अभंग

संत मुक्ताबाईच्या एकूण अभंगापैकी केवळ सहाच अभंग हे गुरूकृपेविषयीचे आहेत. सद्गुरू प्रसादाचे वर्णन या अभंगात असून या अभंगरचनेवर ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणीचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. यातून सातत्याने ज्ञानाचे वर्णन येते. मुक्ताबाई प्रपंचातून मुक्त झालेल्या असल्यामुळे त्यांच्या अभंगातून 'मुक्तीचा व मुक्तपणाचा' वारंवार उल्लेख होतो. निवृत्तीनाथ हे

मुक्ताबाईचे गुरू आहेत. निवृत्तीनाथानीच आपणास जगण्याची दृष्टी दिली. दिव्य तेज दिले. मुक्तीचा मार्ग दाखविला, म्हणून मुक्ताबाईने आपल्या गुरूशिष्याच्या नात्यावर प्रकाश टाकणारी काही अभंग रचना केलेली आहे.

या गुरूकृपेच्या अभंगातून तिने निवृत्तीनाथांविषयी कृतार्थ भाव विनम्रपणे व्यक्त केला आहे. 'गुरूशिवाय जीवन नाही, गुरूशिवाय ज्ञान नाही' अशीच तिची भूमिका आहे. माणसाला एकदा गुरूकृपा झाली की त्याला श्रीहरीचा विसर पडत नाही, म्हणूनच या भवसागरातून मुक्त होण्यासाठी मुक्ताबाईंनी गुरूमार्गाचा अवलंब केला आहे.

## हरिपाठाचे अभंग

प्रथम हरिपाठाच्या अभंगात मुक्ताबाईचे दर्शन होते. या हरिपाठाच्या अभंगरचनेपूर्वी निवृत्तीनाथ, ज्ञानदेव व सोपान यांचे अभंग असून शेवटी मुक्ताबाईचे हरिपाठ आहेत. हरीपाठ म्हणजे हरीच्या नामाचे महत्त्व स्पष्ट करणे किंवा पटवून सांगणे. हरीपाठामुळे माणसांची जीवनातून मुक्ती मिळते, जीवनाचा उद्धार होतो. संसाराच्या मायेतून मुक्ती मिळते. मुक्तीचा मार्ग हरीपाठाशिवाय कोणीही दाखविणार नाही. निवृत्तीनाथ व ज्ञानदेवाच्या अभंगाच्या संस्कारातूनच मुक्ताबाईचे हरिपाठ वाचकांसमोर येतात. या तिच्या हरिपाठात तिच्या अनुभवाच्या भावविश्वाचे दर्शन होते. मुक्ताबाईच्या या हरिपाठाच्या अभंगातून मुक्त, मुक्तपण, मुक्ती, मुक्ताई, मुक्तामुक्त, जीवन्मुक्त यासारख्या अनेक आत्मदर्शक शब्दांचे पुन्हा पुन्हा उल्लेख येतात. मुक्ताबाईच्या हरिपाठातील 'मुक्त' यासारख्या शब्दांतून त्या आपल्या आत्मरूपाचे दर्शन देतात.

हरीपाठामुळे माणसांच्या जीवनातील वासना नष्ट होतील. वासनांच्या विकारात अडकून पडलेल्या माणसांना हरीपाठातून जगण्याची दिशा मिळेल व त्यास सद्‌गती प्राप्त होऊ शकेल. हरीपाठामध्ये प्रचंड ताकद असल्याचा आत्मविश्वास मुक्ताबाईंनी व्यक्त केला आहे. हरीपाठामध्ये प्रचंड सामर्थ्य आहे. या हरीनामाच्या बळावरच दगडसुद्धा समुद्राच्या पाण्यावर तरंगतात. हरीनाम घेण्यासाठी कोणताही खर्च करावा लागत नाही. दूरवरची तीर्थयात्रा करण्याची गरज नाही.आपल्याच घरी बसून आपणास हरीपाठाचा जप करता येणे शक्य असल्याचा विचार मुक्ताबाईंनी स्पष्ट केला आहे. या हरीपाठाच्या अभंगामुळे मुक्ताबाईंचे अन्न, पाणी आणि श्वास हा विठ्ठल झालेला आहे. हरीपाठामुळे मुक्ताबाईला मरणाची चिंता राहिलेली नाही. मुक्ताबाईच्या जीवनात कितीही संकटे आली, दुःख आले व पर्यायाने मृत्यूही आला तरी ती हरीनामाला जीवापाड जपणारी आहे असा प्रचंड आत्मविश्वास तिच्या अभंगातून व्यक्त होतो. हरिपाठातील तिच्या उपदेशाचे चिंतनही स्पष्ट होते. संत मुक्ताबाईने आपल्या जीवनाच्या संसाराची सर्व बंधने तोडून टाकून हरीपाठाचा स्वीकार केलेला आहे. याच हरिपाठाच्या मदतीने ती विठ्ठलाच्या चरणी पूर्णपणे समरस झाल्याचे चिंतनही व्यक्त झाले आहे.

## आध्यात्मिक अंगाईगीते

मुक्ताबाईंची 'अंगाईगीते' ही प्रामुख्याने चांगदेवाच्या संवादातून निर्माण झाली आहेत. अंगाईगीतातून मुक्ताबाई ही खऱ्या अर्थाने मुक्ताई झाली आहे. चांगदेवामुळेच कुमारीका मुक्ताबाई ही 'मातृत्वाच्या' भूमिकेत आली आहे.

मुक्ताबाईच्या या अंगाईगीतातून प्रतिमांची भाषा अधिक प्रमाणात जाणवते. 'मुक्ताबाईंची ही अंगाईगीते अखेर उपदेशपर आहेत हे विसरून चालणार नाही. मुक्ताई चांगदेवाला उद्देशून अंगाईगीत गाते म्हणजे पुन्हा त्यास उपदेशच करीत असते. येथे त्यांची भूमिका केवळ उपदेशकाची नाही, तर अनुभविकाची आहे.'[२] मुक्ताबाईच्या या अंगाईगीतावर ज्ञानदेवांच्या अभंगाचे संस्कार असले तरी मुक्ताबाईच्या अनुभविकांचे सामर्थ्य मोठ्या प्रमाणावर असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

## कूट अभंगरचना

कूट म्हणजे शब्दार्थाची चमत्कृती साधून तयार केलेले कोडे होय. त्यातील प्रश्न आणि आशयामध्ये गूढ असते. एखादा विचार सहजपणे सांगण्याऐवजी तो गूढपणाने सांगितला जातो. त्यातील शब्दांचा नीट व लवकर अर्थबोध होत नाही. कूट रचनेतील जोपर्यंत आशय समजत नाही, तोपर्यंत वाचकाला त्याचा आस्वाद वा आनंद घेता येत नाही. मौखिक वाङ्मयातील म्हणी व उखाणे ही कूट रचनेची उत्कट उदाहरणे आहेत. विविध उपमा, प्रतिमा व संकेताच्या माध्यमातून कूट रचनेची मांडणी केली जाते. संत मुक्ताबाई व चांगदेव यांच्या संवादात्मक अभंगातील तिसरा भाग हा कूट रचनेचा आहे. तसे पाहता ज्ञानदेवापासून अनेक संतांनी कूट अभंगरचना केली आहे. मुक्ताबाईची ही कुटात्मक अभंगरचना ही तिच्या आध्यात्मिक उंचीची साक्ष देणारी आहे. या अशा कुटात्मक अभंगरचेनेतील अनुभव व भाषा ही प्रामुख्याने दुपदरी आहे. तसेच या कूट अभंगरचनेमध्ये भिन्न-भिन्न विरोधात्मक अनुभूतीचे मिश्रण झालेले आहे. मुक्ताबाईच्या कूट अभंगरचनेविषयी डॉ.सुहासिनी इर्लेकर म्हणतात की, 'मुक्ताबाईचे कुटात्म अभंग संख्येने थोडे असतील पण त्यांच्यामुळेच मुक्ताबाई कवयित्री म्हणून चिरंजीव झाली आहे.'

मुक्ताबाईची ही कूटात्म रचना वाचकाला विविध तर्क लावून त्यातील गूढ आशय समजून घेण्यासाठी भाग पाडते. तिच्या कूट रचनेत कृत्रिमपणा वा कल्पनेचा आभास दिसत नाही.

### ओवी

श्री ल.रा.पांगरकर यांनी आपल्या 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड एक' मध्ये मुक्ताबाईची एक ओवी दिली आहे. या तिच्या ओवीतून मौखिक परंपरेच्या गीताशी तिचे नाते दिसून येते. मुक्ताबाई आपल्या दहा ओव्यांतून विविध विषयांना स्पर्श केला आहे. मुक्ताबाईच्या ओवी गीतातून आध्यात्मिक आशय आणि अनुभव सहजपणे व्यक्त झाला आहे. ओवीतून तिने निवृत्तीनाथांना वंदन केले आहे. पृथ्वी, आकाश, वायू, तेज यासारख्या पंचमहाभूतांचीही महती सांगून निवृत्तीनाथांच्या ज्ञानामुळे वा कृपेमुळे मला परमेश्वराचे रूप समजून घेता आले हा भाव व्यक्त केला आहे. तसेच पंढरी, संतांचे माहात्म्य आणि गुरूविषयीचा आदरभावही ओवीतून व्यक्त झाला आहे.

### ताटीचे अभंग

ज्ञानदेवाच्या गाथ्यांमध्ये मुक्ताबाईचे फक्त ४२ अभंग छापलेले आहेत. मात्र 'ताटीचे अभंग' या शीर्षकाचे एक स्वतंत्र प्रकरण मुक्ताबाईच्या नावाने आहे. म्हणून 'ताटीचे अभंग' हे मुक्ताबाईचे नसावे असे श्री ज.र.आजगांवकर यांनी निष्कर्ष काढला असला, तरी श्री ल.रा.पांगारकर व डॉ.अ.ना.देशपांडे यांनी मात्र 'ताटीचे अभंग' हे मुक्ताबाईचेच आहेत हे मान्य केले आहे. तिच्या 'ताटीच्या अभंगा'ची संख्या अकरा एवढी आहे.

मुक्ताबाई ही ज्ञानदेवापेक्षा वयाने लहान आहे. या ज्ञानसंपन्न ज्ञानदेवाला नऊ वर्षाची मुक्ताबाई उपदेश करते. खऱ्या अर्थाने ज्ञानदेवाचे सांत्वन करते. निंदा, छळ, तिरस्कार, अपमान, उपेक्षा यामुळे ज्ञानदेव दुःखी होऊन दार बंद करून घरात बसतात. खरे पाहता ज्ञानदेवाचे जे दुःख आहे, तेच मुक्ताबाईचे दुःख आहे. तत्कालीन धर्मपंडितांनी व जनतेनी घातलेला बहिष्कार आणि भोगलेले दुःख ज्ञानदेव व मुक्ताबाईंनी अनुभवलेले होते. विश्वाच्या सुखासाठी पसायदान मागणाऱ्या ज्ञानदेव दुःखी होऊन ताटी बंद करून घरात बसावे याचे मुक्ताबाईला कमालीचे आश्चर्य वाटते. अपमान, दुःख व छळ सहन करण्याची क्षमता ज्यांच्यामध्ये आहे, त्यांनाच योगी वा संत म्हणून घेण्याचा अधिकार आहे. एखाद्याने अपमान केला म्हणून संपूर्ण जगाकडेच पाठ फिरवून घरात जाऊन बसणे योग्य नाही. आपल्या भावंडांना छळणाऱ्या समाजाची तिला पूर्णपणे जाणीव होती.

'ताटीच्या अभंगा'तून मुक्ताबाई ज्ञानदेवाला आपल्या अवतार कार्याची आठवण करून देतात. विश्वाच्या कल्याणासाठी ज्ञानदेवाची गरज असल्याचे मुक्ताबाईला वाटते. जो स्वतः योगी असतो. 'संत'पणा असणाऱ्यांना राग, लोभ, माया, मोह यासारख्या गोष्टींपासून अलिप्त व दूर रहावे लागते असेही तिला वाटते. लोकांच्या उद्धारासाठी ज्ञानदेवांनी घराबाहेर येण्याची ती विनंती करते. गंगेच्या पावित्र्याप्रमाणे आपण आपले अंतःकरण विशाल करून बाहेर येण्याचीही विनवणी करते. आपण सागरासारखे विशाल होऊन आपण बाहेर येण्याचे ती आवाहन करते. आपल्या लहानशा मुक्ताबाईच्या उपदेशानुसार नव्हे, सांत्वनानुसार एकदाचे ज्ञानदेव ताटी काढून घराबाहेर येतात. अतिशय प्रेमाने मुक्ताबाईला पोटाशी धरून तिचे अश्रू पुसतात. 'ताटीच्या अभंगा'तील हा संवाद बहिण भावामधील असला तरी त्यात लोकोद्धाराची प्रामाणिक तळमळ व भावना आहे. समाजाच्या कल्याणाचा ओलावा आहे. ताटीच्या अभंगाची संपूर्ण रचना ही मधूर व प्रासादिक आहे.

संत मुक्ताबाईला आपल्या भावांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचा प्रचंड अभिमान होता. लोकोद्धाराच्या आत्मचिंतनाने ती बुद्धिनिष्ठ होती. आत्मज्ञान व आत्मशोधातून ती सातत्याने ज्ञानोपासनामध्ये मग्न असत. ज्ञानदेवासारख्या परमज्ञानी संतांना उपदेश करणाऱ्या मुक्ताबाईला सामान्य स्त्री म्हणता येणार नाही. तिच्या संपूर्ण काव्याची अभिव्यक्ती ही स्वानुभवाशी सुसंगत होती. ती आपल्या भावंडामध्ये सर्वात लहान असली तरी आपल्या सर्व भावंडांना तिने त्यांना कर्तव्याची स्पष्टपणे जाणीव करून दिली. पांडुरंगाचे भक्त म्हणून ज्यांचा अहंकार पराकोटीला पोहचला होता, त्या अहंकारी व गर्विष्ठ संत नामदेवांमध्ये परिवर्तन घडवून आणले. मुक्ताबाईच्या अभंगाचा मुख्य गाभा प्रबोधन आहे.

### निष्कर्ष

१) मुक्ताबाईच्या अभंगरचनेतील उपदेश हा केवळ भावनिक पातळीवरील नसून तो बौद्धिक पातळीवरील आहे.
२) संत ज्ञानेश्वर हे आपल्या अभंगातून ज्ञानानुभव देतात, तर मुक्ताबाई ज्ञानच शब्दबद्ध करतात.
३) ज्ञानदेवाप्रमाणेच मुक्ताबाईंनीही आपल्या अभंगात प्रतिमांची भाषा सहजपणे वापरली आहे.
४) ज्ञानदेवांनी आपल्या अभंगातून भावस्थिती स्पष्ट करतात, तर मुक्ताबाईंनी आपल्या अभंगातून ज्ञानस्थिती स्पष्ट करतात.
५) मुक्ताबाईच्या कूट अभंगरचनेतील आशयाची भाषा ही आत्मानुभूतीची व जीवनानुभूतीची आहे.

६) मुक्ताबाईंनी प्रापंचिकाऐजी साधकांना सतत ज्ञानाचा उपदेश केला आहे. ती आत्मज्ञानाशिवाय काहीच सांगत नाही.
७) 'ताटीच्या अभंगा'तून ज्ञानदेवाला उपदेश वा सांत्वन करणारी मुक्ताबाई ही वयाने लहान असली, तरी ती ज्ञानाच्या पातळीवर प्रगल्भ व पौढ झाल्याचे दिसून येते.
८) मुक्ताबाईच्या अभंगात कल्पना वैभव, उपमा, उत्प्रेक्षा व रूपक यांचा वापर उत्स्फूर्तपणे केला आहे.
९) मुक्ताबाईला संतत्व बहाल केले असले तरी, ब्राह्मण धर्मपंडितांनी या भावंडांना बाह्मण जातीत घेतले नाही. त्यांचा बहिष्कारही मागे घेतला नाही.

## संदर्भग्रंथ

१) डॉ.सुहासिनी इर्लेकर, संत कवी आणि कवयित्रीः एक अनुबंध, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, संस्कारित आवृत्ती १५ ऑगस्ट २००६, पृ.क्र.८५.
२) तत्रैव, पृ.क्र.१६५.



**प्रा. डॉ. माधव बसवंते**
**सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख , राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, जि. नांदेड.**